# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
एम.जे.फुले भवन विद्यानगरी,
कलीना सांताक्रुझ (प.)
मुंबई -४०००९८

जा.क्र.:संपवमूमं/२०२०-२१/१ दिनांक : १८ मे,२०२०

परिपत्रक

**उन्हाळी परीक्षा २०२० संदर्भात ---**

**प्रस्तावना :-**

कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव जगात मोठया प्रमाणात सुरु आहे. या साथीच्या रोगाचा प्रसार आणि त्याचा दैनंदिन जीवनावर होणारा प्रभाव व त्याची व्याप्ती राज्याच्या वेगवेगळया भागात भिन्न स्वरुपात दिसून येत आहे. या साथीच्या रोगाचा प्रभाव दीर्घकालीन असू शकतो. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ / महाविद्यालयांमध्ये परीक्षांचे नियोजन आणि शैक्षणिक वेळापत्रकाच्या अंमलबजावणीत अडचणी उद्‌भवत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रो.सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकांबाबत दि.२९ एप्रिल,२०२० रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमीत केल्या. मार्गदर्शक तत्वाच्या आणि उच्च शिक्षणातील भागधारकांच्या सूचनांचा उपयोग करुन समितीने दिनांक ०६ मे,२०२० रोजी महाराष्ट्र सरकारला अहवाल सादर केला. सदर अहवालामधील शिफारसी स्वीकृत केल्या आहेत. या शिफारशीनुसार विद्यापीठांनी दि.०१ जुलै ते ३१ जुलै,२०२० दरम्यान अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षांचे आयोजन करावयाचे आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर साधारणतः दि.१४ मार्च,२०२० पासून महाविद्यालये बंद झाली आहेत. त्यामुळे विद्यार्थी वर्ग हवालदील झाला आहे. सगळीकडे अनिश्चितता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात परीक्षेसंबंधी अनेक शंका निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक क्षेत्राचे पावित्र्य आणि परीक्षा पध्दतीची निष्ठा राखून परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान विद्यापीठासमोर आहे. मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र महानगरी, नागरी, अर्धनागरी, ग्रामीण आदिवासी, डोंगराळ भागात विस्तारलेले आहे. महाविद्यालयांमध्ये साधनसामुग्री व मनुष्यबळ पाहता सुरक्षित अंतर व महाविद्यालयाच्या परिसरात गर्दी न होता परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने उपाय योजले आहेत.

**परिपत्रक :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शिका व शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्र.युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/४१३१ A, दिनांक ०८ मे,२०२० नुसार विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, संलग्नीत / संचलीत महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक / प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपपरिसरांचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाव्दारे उन्हाळी परीक्षा २०२० बाबत प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी यांच्या मनात संभ्रम राहू नये व त्यांना माहिती अवगत व्हावी, या हेतूने खालील बाबी माहिती करीता कळविण्यात येत आहेत.

१) अंतिम सत्राच्या / वर्षाच्या विद्यार्थ्याच्या शासनाच्या निर्देशान्वये परीक्षा हया जुलै,२०२० मध्ये घेण्यात येतील. जसे

- सत्र पध्दतीतील दोन वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास ४ थ्या सत्राची परीक्षा घेण्यात येईल.
- सत्र पध्दतीतील तीन वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास ६ व्या सत्राची परीक्षा घेण्यात येईल.
- सत्र पध्दतीतील चार वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास ८ व्या सत्राची परीक्षा घेण्यात येईल.
- सत्र पध्दतीतील पाच वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास १० व्या सत्राची परीक्षा घेण्यात येईल.
- वार्षिक पध्दतीतील एक वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास पहिल्या वर्षाची परीक्षा घेण्यात येईल.
- वार्षिक पध्दतीतील दोन वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास दुस-या वर्षाची परीक्षा घेण्यात येईल.
- वार्षिक पध्दतीतील तीन वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास तिस-या वर्षाची परीक्षा घेण्यात येईल.
- वार्षिक पध्दतीतील चौथ्या वर्षाचा अभ्यासक्रम असल्यास चौथ्या वर्षाची परीक्षा घेण्यात येईल.

२) अंतिम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस प्रविष्ठ असलेले विद्यार्थी प्रथम, व्दितीय, तृतीय इत्यादी सत्र /वर्षाच्या परीक्षेत काही विषयात अनुत्तीर्ण (ATKT )असल्यास त्या विषयांच्या परीक्षा सुध्दा जुलै,२०२० मध्ये घेण्यात येतील.

उदा. तृतीय वर्ष वाणिज्य सत्र-६ या परीक्षेस असलेल्या विद्यार्थ्याची सत्र-६ ची परीक्षा जुलै,२०२० मध्ये घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर सदर विद्यार्थ्याचे सत्र १ ते ५ या परीक्षेतील अनुत्तीर्ण विषयांची सुध्दा परीक्षा जुलै,२०२० मध्येच घेण्यात येईल.

३) विद्यार्थी अंतिम सत्राची / वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण असेल परंतू प्रथम, व्दितीय व तृतीय इत्यादी परीक्षेत काही विषयात अनुत्तीर्ण असल्यास (ATKT) त्यांची अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा जुलै,२०२० मध्ये घेण्यात येईल.

४) जुलै,२०२० मध्ये घेण्यात येणा-या अंतिम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षा हया दि.१३, मार्च,२०२० पर्यंत शिकविण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार घेण्यात येतील.

५) परीक्षेसंबंधीच्या अधिकच्या माहितीसाठी सोबत जोडलेले प्रपत्र-१ चे अवलोकन करावे.

६) विद्यार्थ्यांच्या किमान उपस्थिती बाबतची टक्केवारी लक्षात घेता, टाळेबंदीचा कालावधी हा त्या विद्यार्थी / संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उपस्थित कालावधी म्हणून ग्राहय धरण्यात यावा.

७) अंतिम वर्षाचे विद्यार्थी सोडून इतर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन ग्रेडींग पध्दतीनुसार (५०% अंतर्गत व ५०% मागील सत्रातील गुण ) करुन निकाल जाहीर करण्यात येईल व त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल व त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा ही महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था/ विद्यापीठ शैक्षणिक विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येईल.

८) ज्या विद्यार्थ्यांना एटीकेटीच्या नियमांमुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये प्रवेश मिळाला नव्हता अशा विद्यार्थ्यांना सुध्दा पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल व त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा ही महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था/ विद्यापीठ शैक्षणिक विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येईल.

९) सन २०१९-२०२० मध्ये अंतिम वर्ष सोडून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सम सत्रांच्या (सत्र-२,४,६,८) हया परीक्षांच्या निकालाची कार्यवाही शासनाच्या आदेशान्वये ५०% चालू सत्रातील अंतर्गत गुण व ५०% मागील सत्रातील गुण ग्राहय धरुन करण्यात येईल.

उदा. प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गाच्या सत्र-२ च्या परीक्षेचा निकाल हा सत्र-२ चे अंतर्गत गुणानुसार ५०% व सत्र-१ च्या गुणातील ५०% गुण ग्राहय धरुन तयार करण्यात येईल.

१०) वार्षिक पध्दतीच्या अभ्याक्रमांमध्ये अंतर्गत गुणांची पध्दत असल्यास अंतिम वर्ष वगळून इतर परीक्षांचा निकाल हा अंतर्गत परीक्षेचे गुण हे १००% ग्राहय धरुन जाहीर करण्यात यावा.

११) ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत गुणांची पध्दती नसेल अशा अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मागील सत्रातील मिळालेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहीर करण्यात येईल.

उदा.व्दितीय सत्र बी.ए. या अभ्यासक्राला अंतर्गत परीक्षा पध्दती नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना प्रथम सत्र बी.ए या वर्गात मिळालेल्या गुणांच्या आधारे व्दितीय सत्र बी.ए. या परीक्षेस गुणदान करण्यात येईल.

१२) अंतिम वर्ष सोडून सन २०१९-२०२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सम सत्र (२,४,६) / वर्ष २,३ व ४ इत्यादी निकालाची कार्यवाही ५०% अंतर्गत व ५०% मागील सत्रातील याबाबत अवलंबविण्याच्या कार्यपध्दती बाबत **विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.**

१३) ५०% अंतर्गत गुण व ५०% मागील सत्रातील गुण या आधारे निकाल जाहीर झाल्यानंतर मिळालेल्या ग्रेडबाबत विद्यार्थी समाधानी नसेल तर सदर विद्यार्थी पुढील सत्रात परीक्षेस प्रविष्ठ होवून ग्रेड मध्ये सुधारणा करु शकतो.

**१४)** अंतिम सत्रातील / वर्षातील विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्रातील परीक्षा किंवा मागील सत्रातील अनुत्तीर्ण विषयांची परीक्षांच्या पध्दती, कालावधी, इत्यादी बाबत माहिती **विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.**

१५) अंतिम सत्रातील / वर्षातील विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्रातील परीक्षा किंवा मागील सत्रातील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षेचे वेळापत्रक महाराष्ट्र शासनाच्या निर्देशान्वये दि.२०जून,२०२० नंतर जाहीर करण्यात येईल.

१६) वरील सर्व बाबी हया सत्र पध्दती, वार्षिक पध्दती, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीच लागू राहतील.

१७) ज्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख ही दि.३१ मार्च,२०२० होती. अशा परीक्षांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी **विद्यापीठ सुधारीत तारखा नमूद करुन परीपत्रक जाहीर करेल.**

१८) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था हे त्यांच्या परीक्षेबाबत स्वतंत्र परिपत्रक जाहीर करतील.

१९) पीएच.डी आणि एम.फील च्या विद्यार्थ्यांना त्यांचे प्रबंध, प्रबंधिका सादर करण्याची अंतिम तारीख किंवा कमाल मर्यादा विद्यापीठाच्या प्रचलित नियम / अधिनियमानुसार संपुष्ठात आली असेल किंवा कोव्हीड-१९ मुळे टाळेबंदीच्या कालावधीत संपुष्ठात येत असेल अशा विद्यार्थ्यांना त्यांचे प्रबंध /प्रबंधिका व त्याबरोबरच्या इतर बाबी सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत वाढ देण्यात येत आहे.

२०) पीएच.डी व एम.फील चे व्हायवा-व्होसे Online पध्दतीने घेण्यासाठी विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु आहे, याबाबतची कार्यप्रणाली विद्यापीठाकडून जाहीर करण्यात येईल.

२१) स्वायत्त महाविद्यालय / विभाग यांना सुध्दा परीक्षेत एकरुपता येण्यासाठी वरील कार्यपध्दती अवलंबविता येईल.

उपरोक्त माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

स्थळ : मुंबई
दिनांक :१८/०५/२०२०

(डॉ.विनोद पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रति,**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, संलग्नीत / संचलीत महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक / प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपपरिसरांचे समन्वयक व सहायक कुलसचिव

**अ) प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ,मुंबई-९८
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
३. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
४. उपकुलसचिव/मुख्यलेखपाल, वित्त व लेखा विभाग,परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
५. उपकुलसचिव, थेसीस विभाग, कलीना कॅम्पस, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
६. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग,परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
७. सर्व सहा.कुलसचिव, परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
८. सर्व यंत्रणा परिचालन अधिकारी,केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
९. समन्वयक एमकेसीएल,परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८

**ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. उपकुलसचिव, (जनसपंर्क) परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
२. उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, मुंबई विद्यापीठ, मुंबई-३२
३. मा.कुलगुरु/प्र.कुलगुरु/कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, मुंबई-३२
४. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८

-x-x-x-x-x-

## प्रपत्र-१

| अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रमाचा कालावधी (वर्ष ) | अभ्यासक्रमाचे एकूण सत्र | अंतिम वर्षाचे सत्र | परीक्षा घेण्यात येईल असे अंतिम वर्षाचे सत्र | परीक्षा न घेता 50% अंतर्गत गुणांच्या आधारे व 50% मागील परीक्षेच्या गुणवत्ते नुसार निकाल जाहीर होणारे सत्र | अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांचे अंतिम सत्राबरोबर मागील सत्रातील अनुत्तीर्ण विषयांच्या होणाऱ्या परीक्षांचे सत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| पदवी परीक्षा (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| बी.ए. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.ए. (सेल्फ फायनन्स) | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.कॉम. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.कॉम. (सेल्फ फायनन्स) | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.एम.एस. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.एस्सी. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.एस्सी. (सेल्फ फायनन्स) | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.व्होक | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.एम.एस/एम.बी.ए. पाच वर्षीय अभ्यासक्रम | ५ | १० | ९ व १० | १० | २,४,६ व ८ | ७,८ व ९ |
| बी.ई. | ४ | ८ | ७ व ८ | ८ | २,४ व ६ | ५, ६ व ७ |
| बी.फार्म. | ४ | ८ | ७ व ८ | ८ | २,४ व ६ | ५, ६ व ७ |
| बी.आर्क | ५ | १० | ९ व १० | १० | २,४,६ व ८ | ९ |
| एल.एल.बी. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | ३,४ व ५ |
| बी.एल.एस. पाच वर्षीय अभ्यासक्रम | ५ | १० | ९ व १० | १० | २,४,६ व ८ | ७,८ व ९ |
| बी.बी.ए./एलएल.बी.- पाच वर्षीय अभ्यासक्रम | ५ | १० | ९ व १० | १० | २,४,६ व ८ | ७,८ व ९ |
| बी.एड.B.Ed | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ |
| बी.पीएड. | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ |
| बी.बी.एम. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.एस.डब्ल्यु. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.लिब.सायन्स | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | १,२,३,४ व ५ |
| बी.एफ.ए. | ४ | - | ४ वर्ष | ४ वर्ष | २ वर्ष व ३ वर्ष | लागू नाही. |

| पदव्युत्तर अभ्यासक्रम (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी./एम.ई/एम.फार्म/ एम.आर्क. एम.व्होक | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ (नियमानुसार लागू असलेले ) |
| एम.सी.ए. | ३ | ६ | ५ व ६ | ६ | २ व ४ | ३,४ व ५ |
| एम.एफ.ए. | २ | २ वर्ष | वर्ष २ | वर्ष २ | १ वर्ष | लागू नाही. |
| एम.एम.एस. | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | ३ |
| एम.एड. | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ |
| एम.पी.एड. | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ |
| एलएल.एम. | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ |
| एम.एस.डब्ल्यु. | २ | ४ | ३ व ४ | ४ | २ | १,२ व ३ |
| अर्धवेळ तीन वर्षीय पदव्युत्तर व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रम (PART TIME THREE YEAR MASTER PROGRAMS IN MANAGEMENT) | 3 | ३ वर्ष | - | वर्ष ३ | २ वर्ष | लागू नाही. |
| एक वर्ष कालावधी असलेला पदविका अभ्यासक्रम (महाविद्यालय/ विद्यापीठ विभाग ) | 1 | १ वर्ष | वर्ष १ | वर्ष १ | ------- | |

**सूचना : वर नमूद केलेल्या अभ्यासक्रमा व्यतिरिक्त काही अभ्यासक्रम असतील त्यासाठी सारख्या कालावधीचा अभ्यासक्रमाचा संदर्भ घ्यावा**

# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
एम.जे.फुले भवन विद्यानगरी,
कलीना, सांताक्रुझ (प.)
मुंबई -४०००९८

जा.क्र.:संपवमूमं/२०२०-२१/४ दिनांक : २२ मे,२०२०

## परिपत्रक

**उन्हाळी परीक्षा २०२० मधील अंतिम सत्र / वर्ष वगळून इतर परीक्षांच्या निकालाच्या कार्यवाही संदर्भात..**

विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शिका व शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्र.युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/४१३१ A, दिनांक ०८ मे,२०२० तसेच मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. जा.क्र.:संपवमूमं/२०२०-२१/१, दि.१८ मे,२०२० नुसार विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, संलग्नीत / संचलीत महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक / प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपपरिसरांचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाव्दारे उन्हाळी परीक्षा २०२० मधील अंतिम सत्र / वर्ष वगळून इतर परीक्षांच्या निकालाच्या कार्यवाही करण्याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ यांनी दि.२१/०५/२०२० रोजी Online झालेल्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित असलेल्या सम सत्राच्या (सत्र २, ४, ६ ८) अंतिम वर्ष वगळून विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता ५०% अंतर्गत गुण व ५०% त्याच वर्षातील मागील विषम सत्राचा (१, ३, ५ ७) गुणांच्या आधारावर निकाल लावण्याची कार्यप्रणाली खालील प्रमाणे :-

१) ज्या नियमित विद्यार्थ्यांच्या सत्र २, ४, ६ इ. अंतर्गत गुणाच्या परीक्षा राहिल्या असल्यास त्या Online पध्दतीने, लघु प्रबंध सादर करुन, दूरध्वनीव्दारे मौखिक परीक्षा घेवून किंवा सादरीकरण करण्यास सांगून, निरंतर मूल्यमापन इत्यादी सोईस्कर पध्दतीचा अवलंब करुन पूर्ण करण्यात याव्यात.

२) मागील सत्राचे सरासरी गुण काढण्यासाठी विद्यार्थ्याच्या सर्व विषयांचे गुण ग्राहय धरावेत. यात नापास किंवा पास सर्व विषयांच्या (Theory, Practical, Oral, Term work ) गुणांची बेरीज घेवून त्यानुसार त्याचे ५० गुणांमध्ये रुपांतर करण्यात यावे. यात विषम सत्राच्या परीक्षेतील एखाद्या विषयास पुर्नमूल्यांकनाच्या गुणात बदल झाले असतील तर पुर्नमूल्यांकनाचे गुण ग्राहय धरण्यात यावेत.

३) ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षांना अंतर्गत गुणांची पध्दत नसेल अशा अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या विषम सत्रातील विषयांचे गुण सम सत्रातील विषयांना देण्यात यावेत. उदा. सत्र-२ साठी सत्र-१ चे गुण, सत्र-४ साठी सत्र-३ चे गुण इत्यादी. यात विषम सत्रातील विषयाचे गुण सम सत्रातील कुठल्या विषयास द्यावेत, यासाठी -

एफ.वाय. व एस.वाय.बी.ए.साठी प्रपत्र -१ चे अवलोकन करावे.

एफ.वाय. व एस.वाय.बी.कॉम.साठी प्रपत्र -२ चे अवलोकन करावे,

एफ.वाय. व एस.वाय.बी.एस्सी. साठी प्रपत्र -३ चे अवलोकन करावे.

(प्रपत्रातील रकाना अ मधील विषया समोर रकाना ब मध्ये दाखविण्यात आलेल्या विषयाचे गुण द्यावेत.)

Foundation course या विषयात अंतर्गत गुण सम सत्रात उपलब्ध असतील तर ते सम सत्रातील घ्यावेत व ७५ पैकी असलेले बहि:स्थ गुण मागील सत्रातील (विषम) घ्यावेत. अंतर्गत २५ गुण हे सम सत्रातील उपलब्ध नसल्यास ते सुध्दा मागील सत्रातील (विषम) घ्यावेत.

४) तीन वर्षीय एलएल.बी. यातील व्दितीय वर्ष एलएल.बी. व पाच वर्षीय बी.एल.एस. मधील व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या (शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थी) निकालासाठी त्या-त्या वर्षातील विषम सत्राचे विषयांच्या गुणांचे सरासरी गुण काढून ते गुण सम सत्राच्या सर्व विषयांना देण्यात यावेत.

उदा. सत्र-२ च्या परीक्षेसाठी सत्र-१ (ऑक्टोबर,२०१९ मधील परीक्षेतील) गुणांच्या सरासरीने गुण देण्यात यावेत.

५) ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षांना अंतर्गत गुणांची पध्दत असेल त्यासाठी -खालील प्रमाणे सन २०१९-२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठीच वापर करावा.

पर्याय-१ : ज्या अभ्यासक्रमास सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) २५ गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ७५ गुण असतील

उदा. : सत्र-१ मागील परीक्षेतील गुण (ऑक्टोबर २०१९ ) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील

| विषय | अंतर्गत गुण २५ पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ७५ पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| विषय क्र.१ | १७ | ५५ | ७२ |
| विषय क्र.२ | २० | १५ | ३५ |
| विषय क्र.३ | २२ | ५० | ७२ |
| विषय क्र.४ | २३ | ५४ | ७७ |
| विषय क्र.५ | २० | ५१ | ७१ |

वरील विषयांच्या गुणांची एकत्रित बेरीज ३२७ असून सदरचे गुण हे ५०० पैकी आहेत. सदर गुणांचे १०० गुणांत रुपांतर केले असता, ते ६५ (पूर्णांकात रुपांतर केल्यानंतर) येतात, त्यामुळे पुढील सत्रासाठी ५०% गुण देण्यासाठी ५० पैकी ३३ (पूर्णांकात रुपांतर केल्यानंतर) गुण ग्राहय धरण्यात यावेत.

सत्र-२ परीक्षेतील गुण (एप्रिल,२०२०) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तयार होतील.

| विषय | अंतर्गत गुण २५ पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ७५ पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| | | २५+५० | |
| विषय क्र.१ | २१ | २१+३३=५४ | ७५ |
| विषय क्र.२ | २३ | २३+३३=५६ | ७९ |
| विषय क्र.३ | १९ | १९+३३=५२ | ७१ |
| विषय क्र.४ | १८ | १८+३३=५१ | ६९ |
| विषय क्र.५ | २४ | २४+३३=५७ | ८१ |

वरील तक्त्यात २५ पैकी अंतर्गत गुण हे सत्र-२ मधील अंतर्गत गुण आहेत. ७५ पैकी गुण तयार करतांना २५ पैकी सत्र-२ मधील अंतर्गत असलेले गुण व ५०% मागील सत्रातील गुण ३३ हे घेवून तयार करण्यात आलेले आहेत व अंतर्गत व बहि:स्थ (२५+७५) यांच्या गुणांची बेरीज एकूण गुण १०० पैकी दर्शविण्यात आलेले आहेत.

पर्याय-२ : ज्या अभ्यासक्रमास सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) २० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ८० गुण असतील.

उदा. : सत्र-१ मागील परीक्षेतील गुण (ऑक्टोबर २०१९ ) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील

| विषय | अंतर्गत गुण २० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ८० पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| विषय क्र.१ | १७ | ५५ | ७२ |
| विषय क्र.२ | १५ | ५० | ६५ |
| विषय क्र.३ | १६ | ५० | ६६ |
| विषय क्र.४ | १७ | ५४ | ७१ |
| विषय क्र.५ | २० | ५१ | ७१ |

वरील विषयांच्या गुणांची एकत्रित बेरीज ३४५ असून सदरचे गुण हे ५०० पैकी आहेत. सदर गुणांचे १०० गुणांत रुपांतर केले असता, ते ६९ येतात, त्यामुळे पुढील सत्रासाठी ५०% गुण देण्यासाठी ५० पैकी ३५ (पूर्णांकात रुपांतर केल्यानंतर) गुण ग्राहय धरण्यात यावेत.

सत्र-२ परीक्षेतील गुण (एप्रिल,२०२०) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तयार होतील.

| विषय | अंतर्गत गुण २० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ८० पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| | | ३०""+५० | |
| विषय क्र.१ | १९ | २९+३५=६४ | ८३ |
| विषय क्र.२ | २० | ३०+३५=६५ | ८५ |
| विषय क्र.३ | १८ | २७+३५=६२ | ८० |
| विषय क्र.४ | १६ | २४+३५=५९ | ७५ |
| विषय क्र.५ | १७ | २६+३५=६१ | ७८ |

वरील तक्त्यात २० पैकी अंतर्गत गुण हे सत्र-२ मधील अंतर्गत गुण आहेत. ८० पैकी गुण तयार करतांना २० पैकी सत्र-२ मधील अंतर्गत हे ३०"" मार्कामध्ये रुपांतर करण्यात असलेले आहेत. व गुण व ५०% मागील सत्रातील गुण ३५ गुण घेवून तयार करण्यात आलेले आहेत व अंतर्गत व बहि:स्थ (२०+८०) यांच्या गुणांची बेरीज एकूण गुण १०० पैकी दर्शविण्यात आलेले आहेत.(५०% अंतर्गत गुणांसाठी २० पैकी असलेले अंतर्गत गुण हे बहि:स्थ परीक्षेमध्ये ३० या प्रमाणात करण्यात आलेले आहेत.)

पर्याय-३ : ज्या अभ्यासक्रमास सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) ४० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ६० गुण असतील.

उदा. : सत्र-१ मागील परीक्षेतील गुण (ऑक्टोबर २०१९) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील

| विषय | अंतर्गत गुण ४० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ६० पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| विषय क्र.१ | ३० | ३५ | ६५ |
| विषय क्र.२ | ३२ | ३७ | ६९ |
| विषय क्र.३ | ३३ | ४० | ७३ |
| विषय क्र.४ | ३५ | ४१ | ७६ |
| विषय क्र.५ | २८ | ३९ | ६७ |

वरील विषयांच्या गुणांची एकत्रित बेरीज ३५० असून सदरचे गुण हे ५०० पैकी आहेत. सदर गुणांचे १०० गुणांत रुपांतर केले असता, ते ७० येतात, त्यामुळे पुढील सत्रासाठी ५०% गुण देण्यासाठी ५० पैकी ३५ गुण ग्राहय धरण्यात यावेत.

सत्र-२ परीक्षेतील गुण (एप्रिल,२०२०) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तयार होतील.

| विषय | अंतर्गत गुण ४० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ६० पैकी (External) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| | | १०""+५० | |
| विषय क्र.१ | ३० | ८+३५=४३ | ७३ |
| विषय क्र.२ | ३२ | ८+३५=४३ | ७५ |
| विषय क्र.३ | ३३ | ८+३५=४३ | ७६ |
| विषय क्र.४ | ३५ | ९+३५=४४ | ७९ |
| विषय क्र.५ | २८ | ७+३५=६१ | ७० |

वरील तक्त्यात ४० पैकी अंतर्गत गुण हे सत्र-२ मधील अंतर्गत गुण आहेत. ६० पैकी गुण तयार करतांना ४० पैकी सत्र-२ मधील अंतर्गत हे १०"" मार्कामध्ये रुपांतर करण्यात असलेले आहेत. व ५०% मागील सत्रातील गुण ३५ गुण घेवून तयार करण्यात आलेले आहेत व अंतर्गत व बहि:स्थ (४०+६०) यांच्या गुणांची बेरीज एकूण गुण १०० पैकी दर्शविण्यात आलेले आहेत.(५०% अंतर्गत गुणांसाठी ४० पैकी असलेले अंतर्गत गुण हे बहि:स्थ परीक्षेमध्ये १० या प्रमाणात करण्यात आलेले आहेत.)

पर्याय-४ : ज्या अभ्यासक्रमास सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) ३० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ७० गुण असतील.

उदा. : सत्र-१ मागील परीक्षेतील गुण (ऑक्टोबर २०१९ ) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील

| विषय | अंतर्गत गुण ३० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ७० पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| विषय क्र.१ | २५ | ३५ | ६० |
| विषय क्र.२ | २३ | ३७ | ६० |
| विषय क्र.३ | २२ | ३७ | ५९ |
| विषय क्र.४ | २२ | ४० | ६२ |
| विषय क्र.५ | २० | ३९ | ५९ |

वरील विषयांच्या गुणांची एकत्रित बेरीज ३०० असून सदरचे गुण हे ५०० पैकी आहेत. सदर गुणांचे १०० गुणांत रुपांतर केले असता, ते ६० येतात, त्यामुळे पुढील सत्रासाठी ५०% गुण देण्यासाठी ५० पैकी ३० गुण ग्राहय धरण्यात यावेत.

सत्र-२ परीक्षेतील गुण (एप्रिल,२०२०) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तयार होतील.

| विषय | अंतर्गत गुण ३० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ७० पैकी (External) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| | | २०""+५० | |
| विषय क्र.१ | २६ | १७+३०=४७ | ७३ |
| विषय क्र.२ | २४ | १६+३०=४६ | ७० |
| विषय क्र.३ | २० | १३+३०=४६ | ६३ |
| विषय क्र.४ | २५ | १७+३०=४७ | ७२ |
| विषय क्र.५ | २३ | १५+३०=४५ | ६८ |

वरील तक्त्यात ३० पैकी अंतर्गत गुण हे सत्र-२ मधील अंतर्गत गुण आहेत. ७० पैकी गुण तयार करतांना ३० पैकी सत्र-२ मधील अंतर्गत हे २०"" मार्कामध्ये रुपांतर करण्यात असलेले आहेत व ५०% मागील सत्रातील गुण ३० गुण घेवून तयार करण्यात आलेले आहेत व अंतर्गत व बहि:स्थ (३०+७०) यांच्या गुणांची बेरीज एकूण गुण १०० पैकी दर्शविण्यात आलेले आहेत.(५०% अंतर्गत गुणांसाठी ३० पैकी असलेले अंतर्गत गुण हे बहि:स्थ परीक्षेमध्ये २० या प्रमाणात करण्यात आलेले आहेत.)

पर्याय-५ : ज्या अभ्यासक्रमास सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) ६० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ४० गुण असतील.

उदा. : सत्र-१ मागील परीक्षेतील गुण (ऑक्टोबर २०१९ ) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील

| विषय | अंतर्गत गुण ६० पैकी (Internal) | बहि:स्थ गुण ४० पैकी (External ) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|
| विषय क्र.१ | ३५ | ३० | ६५ |
| विषय क्र.२ | ३८ | ३१ | ६९ |
| विषय क्र.३ | ३३ | ३३ | ६६ |
| विषय क्र.४ | ५० | ३६ | ८६ |
| विषय क्र.५ | ५२ | ३४ | ८६ |

वरील विषयांच्या गुणांची एकत्रित बेरीज ३७२ असून सदरचे गुण हे ५०० पैकी आहेत. सदर गुणांचे १०० गुणांत रुपांतर केले असता ते ७४ (पूर्णांकात रुपांतर केल्यानंतर) येतात, त्यामुळे पुढील सत्रासाठी ४०% गुण देण्यासाठी ४० पैकी ३० (पूर्णांकात रुपांतर केल्यानंतर) गुण ग्राहय धरण्यात यावेत. कारण सदर पॅटर्न मध्ये मुळातच ६०% अंतर्गत गुणांची पध्दत आहे.

सत्र-२ परीक्षेतील गुण (एप्रिल,२०२०) हे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तयार होतील.

| विषय | अंतर्गत गुण ६० पैकी (Internal) प्रत्यक्षात मिळालेले | अंतर्गत गुण ६० पैकी (Internal) प्रत्यक्षात घेण्यासाठी | बहि:स्थ गुण ४० पैकी (External) | एकूण गुण १०० पैकी |
|---|---|---|---|---|
| | | ५०'+१०"" | | |
| विषय क्र.१ | ५५ | ४६+८=५४ | ३० | ८४ |
| विषय क्र.२ | ५२ | ४३+८=५१ | ३० | ८१ |
| विषय क्र.३ | ४८ | ४०+८=४८ | ३० | ७८ |
| विषय क्र.४ | ५३ | ४४+८=५२ | ३० | ८२ |
| विषय क्र.५ | ४९ | ४१+८=४९ | ३० | ७९ |

वरील तक्त्यात ६० पैकी अंतर्गत गुण हे सत्र-२ मधील अंतर्गत गुण आहेत. परंतू अंतर्गत परीक्षेत ५०% गुण ग्राहय धरायाचे असल्यामुळे ६० पैकी मिळालेले गुण हे ५० पैकी मिळालेल्या गुणांमध्ये रुपांतरीत करुन ५०' या रकान्यात दाखविलेले आहेत. परंतू अंतर्गत ६० गुण द्यावयाचे असल्यामुळे मागील सत्रातील सरासरी ही ४० गुणांपैकी ३० दर्शविण्यात आलेली आहे. ते ३० गुण १० मार्कांपैकी रुपांतरीत केल्यास ८ गुण होतात हे गुण अंतर्गत गुणांमध्ये मिळविण्यासाठी १०"" या रकान्यात दाखविलेले आहेत. तसेच ४० पैकी गुण तयार करतांना ४०% मागील सत्रातील गुण ३० गुण घेवून तयार करण्यात आलेले आहेत व अंतर्गत व बहि:स्थ (६०+४०) यांच्या गुणांची बेरीज एकूण गुण १०० पैकी दर्शविण्यात आलेले आहेत.)

६) वरील पर्यायामध्ये दर्शविल्याप्रमाणे सम सत्राचा निकाल तयार करतांना परीक्षेच्या पॅटर्ननुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या सत्रात जेवढे विषय असतील त्यानुसार गुण तयार करावेत. विद्यापीठाच्या नियमानुसार ग्रेस, अध्यादेश इत्यादींचा वापर करुन त्या परीक्षेस जी ग्रेडींग पध्दत (७ Point / १० Point ) असेल त्यानुसार निकाल जाहीर करावा व प्रचलित पध्दतीप्रमाणे गुणपत्रके द्यावेत.

७) वरील ग्रेडींग पध्दतीचा वापर करुन विद्यार्थी सम सत्रांचे काही विषय अनुत्तीर्ण राहिल्यास त्याची परीक्षा महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था / विद्यापीठ विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येतील.

८) वरील पध्दतीचा अवलंब करीत असतांना क्र.३ मधील अंतर्गत गुणांची परीक्षा नसलेल्या अभ्यासक्रमांना जर विद्यार्थी विषम सत्राचा विषय अनुत्तीर्ण असेल तर अशा विद्यार्थ्यांची मागील विषम सत्रातील विषयाची परीक्षा महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था / विद्यापीठ विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येणार असल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे सम सत्राचे निकाल विषम सत्राचा निकाल लागल्यानंतर तयार करण्यात यावेत. जर एखादा विद्यार्थी विषम व सम या दोन्ही सत्राचा विषय अनुत्तीर्ण राहिल्यास त्यास अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा पुढील सत्राच्या वेळी ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२० च्या परीक्षेच्या वेळी द्यावी लागेल.

९) ५०% अंतर्गत व ५०% मागील परीक्षेतील या पध्दतीचा वापर करुन जर एखादा विद्यार्थी मागील परीक्षेत विषम सत्रात एखादा विषय अनुत्तीर्ण असेल परंतू ५०% अंतर्गत व ५०% मागील गुणांनुसार सम सत्रातील सर्व विषय उत्तीर्ण होत असेल अशा विद्यार्थ्यांचा सम सत्राचा निकाल जाहीर करावा व विद्यार्थी विषम सत्रातील विषय १२० दिवसाच्या आत होणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण झाला तर सम सत्राचा निकाल बदलण्यात येवू नये.

१०) वरील पध्दतीने ग्रेडींगचा वापर करुन निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यास ग्रेडमध्ये सुधारणा करावयाची असल्यास महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था / विद्यापीठ विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येणाऱ्या परीक्षेत करता येईल.

११) ५०% अंतर्गत व ५०% मागील परीक्षेतील या पध्दतीचा वापर करुन विद्यार्थी सम सत्रात काही विषय अनुत्तीर्ण राहिला तसेच महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था / विद्यापीठ विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत होणाऱ्या परीक्षेत सम सत्र किंवा विषम सत्रातील काही विषय अनुत्तीर्ण झाल्यास, (ग्रेड सुधारणा करणारे वगळून) अशा विद्यार्थ्यास पुढील सत्राच्या परीक्षेत ऑक्टोबर /नोव्हेंबर,२०२० च्या परीक्षेत अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा द्यावी लागेल.

१२) काही महाविद्यालयांनी मार्च,२०२० मध्ये सम सत्र-२ व ४ याच्या काही विषयाच्या परीक्षा घेतलेल्या आहेत. त्या महाविद्यालयांनी सदरच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करावे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करतांना बहि:स्थ परीक्षकाकडून Moderation करण्याची आवश्यकता नाही. सदर विषयात मिळालेले गुण व ५०% अंतर्गत व ५०% मागील सत्रातील नुसार तयार केलेले गुण यातील जे गुण जास्त असतील ते विद्यार्थ्यास ग्राहय धरण्यात यावेत. तसेच विद्यार्थ्यास यानुसार जाहीर करण्यात आलेल्या निकालाची ग्रेड मध्ये सुधारणा करावयाची झाल्यास त्याला सुध्दा महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था / विद्यापीठ विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत होणाऱ्या परीक्षेस सुधारणा करता येईल.

१३) काही महाविद्यालयांनी मार्च,२०२० मध्ये विषम सत्र-१ व ३ यांच्या काही विषयाच्या परीक्षा घेतलेल्या आहेत. त्या महाविद्यालयांनी सदरच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करावे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करतांना बहि:स्थ परीक्षकाकडून Moderation करण्याची आवश्यकता नाही. सदर परीक्षा पूर्ण झाल्या असतील तर विद्यापीठाच्या नियमानुसार निकाल जाहीर करावेत. जर परीक्षा अपूर्ण राहिल्या असतील तर उर्वरीत विषयांच्या परीक्षा हया महाविद्यालय / विद्यापीठ परिसंस्था / विद्यापीठ विभाग सुरु झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात याव्यात व तद्नंतर निकाल जाहीर करण्यात यावा.

१४) वरील कार्यपध्दती ही उन्हाळी २०२० च्या परीक्षेसाठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज सादर केलेले आहेत, अशाच विद्यार्थ्यांना उन्हाळी २०२० च्या परीक्षेपुरतीच लागू राहील.

वरील पध्दतींचा आवश्यकतेनुसार वापर करुन ज्या परीक्षांचे निकाल विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयांमार्फत जाहीर केले जात असतील अशा परीक्षांचे निकाल महाविद्यालयांनी जाहीर करावेत. तसेच ज्या परीक्षांचे निकाल परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्या मार्फत जाहीर होत असतील, अशा परीक्षांचे निकाल परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ यांनी जाहीर करावेत.

उपरोक्त माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

स्थळ : मुंबई
दिनांक :२२/०५/२०२०

(डॉ.विनोद पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रति,**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, संलग्नीत / संचलीत महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक / प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपपरिसरांचे समन्वयक व सहायक कुलसचिव

**अ) प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ,मुंबई-९८
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
३. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
४. उपकुलसचिव/मुख्यलेखपाल, वित्त व लेखा विभाग,परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
५. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग,परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
६. सर्व सहा.कुलसचिव, परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
७. सर्व यंत्रणा परिचालन अधिकारी,केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
८. समन्वयक एमकेसीएल,परीक्षा विभाग,मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८

**ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. उपकुलसचिव, (जनसपंर्क) परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८
२. उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, मुंबई विद्यापीठ, मुंबई-३२
३. मा.कुलगुरु/प्र.कुलगुरु/कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, मुंबई-३२
४. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, मुंबई-९८

-x-x-x-x-x-

**Dr. Vinod Patil**
**Director,**
**Board of Examinations & Evaluation**

**University of Mumbai**
**M. J. Phule Bhavan,**
**Examination Section,**
**Santacruz (East),**
**Mumbai 400098.**

(MU Exam Mission – 2020)

Circular No. Exam/DBOEE/ICC/2020-21-04

**CIRCULAR-II**

In continuation of Circular No. Exam/DBOEE/ICC/2020-21-02 dated Sept. 08, 2020, the Principals / Directors of the affiliated Colleges / Institutions and all concerned are hereby informed that the overall guidelines in reference to framing of MCQ bank and role of Lead Colleges and Cluster in conduct of online examinations during Sept. 25 -Oct 17, 2020 for the Academic Year 2019-20 are as follows :-

## I. Constitution of Clusters and appointment of Lead College

The concept of Cluster and Lead College, with due approval of Academic Council, is to bring together the group of affiliated Colleges in a given geographical region offering similar programmes (Arts, Commerce and Sciences, Management Engineering, Pharmacy, Architecture, Law, Education, Special Education, Physical Education, Fine Arts, Applied Arts etc.) and facilitate the synchronization and cooperation with respect to the execution of various academic, examination, co-curricular, extra-curricular and other higher education policies decided by various statutory bodies of University of Mumbai. The concept permits principle of synergism in terms of sharing of information, human resources, and infrastructure. It also encourages the colleges to achieve excellence in higher education in consonance with the policies of higher education as given by the University itself or the relevant Government Directives.

As per the decisions of Statutory Bodies (BOEE, AC and MC) and subsequently as per the circular No. Exam/DBOEE/ICC/2020-21-02, Lead Colleges have been assigned the task of cluster-wise conduct of online MCQ examination of Final Year / Final Semester students during Sept. 25 -Oct 17, 2020 for the Academic Year 2019-20.

## II. Guidelines to Lead Colleges for Preparing the Question Bank for Final Year / Final Semester students:

1) As per the decisions of Statutory Bodies (BOEE, AC and MC), University of Mumbai has adopted the format of Multiple-Choice Questions (MCQ) for external evaluation of Final Year / Final Semester students and their backlog examinations to be conducted during Sept. 25 -Oct 17, 2020 for the Academic Year 2019-20.

2) MCQ, with due versatility, validity and reliability, are the effective and efficient way to assess learning outcomes.

3) Final Year / Semester MCQ paper will be based on the syllabus covered till March 13, 2020. For backlog examinations [For UG: Sem. I to V/ Sem. I to VII, Sem. I to IX and for PG: Sem. I to III], the paper setting should be on entire syllabus.

4) Under the guidance of Deans and Associate Deans of respective faculty, the Lead Colleges with due involvement of related subject/ course teachers from colleges within the Clusters should prepare the comprehensive MCQ Bank for each subject/ course [English/ Marathi or as per the medium of instruction] for above mentioned examinations.

5) Inter-cluster support for University Clusters maybe utilised to facilitate preparation of large base of MCQ Bank.

6) Use authentic references (e.g. text or reference book or journals) for framing the MCQ.

7) While setting the MCQ Bank, due attention should be given to cover all the modules/chapters/ units of the syllabus with proper weightage for each unit.

8) The level of students (diploma/undergraduate/ postgraduate) and equitable distribution of the difficulty level of the questions (easy, average, difficult) should be kept in mind while framing the MCQ.

9) The answer key / solution of the MCQ should be invariably provided along with the MCQ Bank as separate Answer Key Bank.

10) MCQ Bank should be large enough to draw in randomized manner the multiple question paper sets with minimal repetition, equitable distribution of the difficulty level of the questions and due coverage of modules/chapters/ units of the syllabus through use of software.

11) MCQ papers will comprise of 25-40 MCQ (number of MCQ to be chosen as per the requirement of particular course). It will be of 1-hour duration and maximum 50 marks.

12) Each MCQ consists of a definite Problem Statement and a list of four suggested solutions known as Alternatives or Options. The 4 alternatives consist of one correct or best alternative, which is the answer. Thus, ensure that every MCQ has 4 alternatives and make sure that there is only one correct answer.

13) Express the full problem and put all the relevant material in the MCQ while avoiding negative phrasing/ wording in the MCQ. The question should be written in the clearest, compact and unambiguous way. Thus, the MCQ should be meaningful by itself and must not contain irrelevant material and excessive wording [i.e. it should contain only material essential for answering the question].

14) The MCQ should be free from spellings, grammatical mistakes and technical errors. The MCQ or alternatives should not include any statement/ wording which is likely to hurt social and religious feelings.

15) All alternatives should be plausible, stated clearly and concisely, mutually exclusive, independent, free from clues about which option is correct. Do not repeat in each of the alternatives information that can be included in the question/ problem statement.

16) While ensuring the correctness of the right answer, it may also be ensured that other alternatives/ options are definitely wrong.

17) Care must be exercised in writing the incorrect answer options (the distractors) thus do not include alternatives that are obviously wrong.

18) Number the alternatives of each question as alphabetical-a., b., c., d. or A., B., C., D. (or alphabets in related languages/ medium of instruction of Question Paper). Do not have bullets or numerical 1,2,3,4 for numbering the alternatives.

19) The alternatives should be presented in a logical and meaningful order to avoid a bias toward certain positions.

20) The alternatives such as 'All of the above', 'None of these' or 'None of the above', 'Other than those given as options', 'true/ false' and 'a & b' should not be used. Avoid overlapping alternatives.

21) These guidelines are general in nature and some subject specific freedom may be exercised while framing MCQ Bank.

22) Sample MCQs should be prepared and provided to develop the understanding/awareness about exam pattern amongst final year/ final semester students. Mock test should be conducted to provide practice and feel of Online MCQ Examinations to students.

---

**III. Other Guidelines for the Lead College:**

1) The Lead College should play the role of mentor, planner and facilitator rather than executor.

2) The Lead College will identify the human resources and technical support available within its cluster for smooth conduct of online examinations.

3) Under the guidance of Deans and Associate Deans of respective faculty, the Lead Colleges with due involvement of related subject/ course teachers from colleges within the Clusters should prepare the comprehensive MCQ Bank for each subject/ course [English/ Marathi or as per the medium of instruction] for Final Year / Final Semester regular and backlog examinations [For UG: Sem. I to V/ Sem. I to VII, Sem. I to IX and for PG: Sem. I to III]. It may assign the task to senior teachers within the cluster of verification and moderation of the MCQ Bank. Inter-cluster support for University Clusters maybe utilised to facilitate preparation of the large base of MCQ Bank.

4) The Lead College will analyse the requirements of the colleges within the cluster and formulate the Online Exam Time-Table accordingly [Avoid arranging exams on 2nd (National holiday) and 4th October (UPSC Exam)] while adhering to the schedules prescribed by the University.

5) Sample MCQs should be provided by the Cluster to develop the understanding/awareness about exam pattern amongst the final year/ final semester students.

6) The Lead College will follow instructions received from the DBOEE from time to time.

### III. Guidelines for the Colleges within the Cluster:

1) The college is responsible for the planning and conduct of the online examinations in consultation with the Lead College within the time frame/schedule prescribed by the University.

2) The colleges and their teachers, under the guidance of Deans and Associate Deans of respective faculty and the Lead Colleges, will participate in framing the MCQ Bank for each subject/ course as per the guidelines prescribed by the University.

3) Mock test should be conducted by Colleges to provide practice and feel of Online MCQ Examinations to students.

4) In consultation with Lead college, the colleges should facilitate the technical infrastructure for conduct of the online examination, complete the assessment within the time and upload the marks obtained by the students after due conversion in tune with max. marks of the concerned course.

5) The Principal is required to work in consultation with the Lead College and coordination of the colleges in cluster while complying with the instructions and the requirements specified in the University circular. It should not act based on the oral instructions from anyone or the messages spread on any social media platform. In case of any doubt/difficulty/ clarification, the Principal should talk to the Principal of Lead College who in turn will interact with the respective Dean or Associate Dean of the University.

### IV. Guidelines for the Students:

1) The students must ensure that they make themselves properly aware of the syllabus, paper pattern, timetable and technical platform used by the college. Thus they must take the examinations as per the time-table schedule prescribed by the college and should make requisite arrangements (Smartphone/ Laptop/Tab/ Desktop/any other gadget, Internet Connectivity) to appear for the online examination.

2) Students should not resort to the use of unfair means while attempting the examination. Colleges will initiate action for use of unfair means as per University rules and regulations
3) Since this is an online examination, there will not be any revaluation.
4) Students should refer to and follow instructions given by Colleges and University. Do not believe in messages spread on any social media platform.

**Date – 13th September, 2020**
**Place – Mumbai**

**(Dr. Vinod Patil)**
**Director**
**Board of Examinations and Evaluation**

**Copy to –**

The Principals / Directors of the affiliated Colleges / Institutions and all concerned.

**Copy for information and necessary action to :-**

All Deputy Registrars and Assistant Registrars Examination section

**Copy for information to :-**

Deans in the Faculty of Humanities, Science and Technology, Commerce and Management, Interdisciplinary.

**Copy for information to :-**

(1) P.A. to Hon'ble Vice-Chancellor (2) P.A. to Hon'ble Pro Vice-Chancellor

(3) P.A. to Registrar (4) P.A to Director, Board of Examinations and Evaluation

**Dr. Vinod Patil**
**Director,**
**Board of Examinations & Evaluation**

**University of Mumbai**
**M. J. Phule Bhavan,**
**Examination Section,**
**Santacruz (East),**
**Mumbai 400098.**

(MU Exam Mission – 2020)

Circular No. Exam/DBOEE/ICC/2020-21-07

**CIRCULAR-II**

In continuation of Circular No. Exam/DBOEE/ICC/2020-21-02 dated Sept. 08, 2020 and Circular No. Exam/DBOEE/ICC/2020-21-04 dated Sept.13, 2020 the Principals / Directors of the affiliated Colleges / Institutions and all concerned are hereby informed that the guidelines with regards to safety, security, administrative and technical requirements of platform/software for conducting online examinations during Sept. 25- Oct. 17, 2020 for the academic year 2019-20 are as follows

**I. All the colleges were asked to conduct the survey of available facilities/ resources.**
**(Smart Mobile Phone, Laptop, Tab, Desktop, internet connectivity etc.) with students which are the prerequisites f or appearing for online examinations. In the absence of those facilities, the students have been asked whether they can make some alternative arrangements. In the extreme condition of the non-availability of the resources, the list of such students with their details are required to be shared to the Lead College to undertake the decision on facilitation of local arrangements/ support in consonance with local government authorities**.

**II. The colleges will have to ensure that the online examination platform/system that will be used by them for the conduct of the final semester/final year and the backlog examinations should meet the following Safety, Security & Administrative support to Students and Technical requirements:**

1) System should be available on mobile, laptop and desktop.
2) Ease of use for students, teachers and administrative staff.
3) Minimum bandwidth requirements of the platform.
4) Locking of application/secured application.
5) Solution for resuming to sessions in case of network failure.
6) Immediate download of the result for each examination.
7) Bulk upload of question bank for paper setters/coordinators.
8) Configurable Question paper as per unit wise and difficulty level weightage.

9) Configurable proctoring for those students without camera facility.
10) Google forms with definite Proctering System may be used
11) Start time as well as end time can be prescribed/specified but has to be activated and de-activated manually if needed.
12) The order/sequence of appearing/display of the questions can be randomized i.e. the order in which the question appears to different students or the same student if he/she takes the examination again will differ from one student to another or from one attempt to another.
13) The order/sequence of the options within the question can also be randomized.
14) After the completion of the time duration, the evaluation data can be exported in excel format.
15) Helpdesk to address the issues during examination.
16) Multilingual support.
17) Specify minimum internet speed and data requirements (.i.e. Bandwidth requirements).
18) If proctored face locking must/optional.

Accordingly, the Lead Institute and concerned college should inform students to get themselves well prepared. Circulate general instructions and step by step procedure/manual/ video to faculty and students to minimize the operational difficulties.

**Date – 16th September, 2020** **(Dr. Vinod Patil)**
**Place – Mumbai** **Director**
**Board of Examinations and Evaluation**

Copy to –

The Principals / Directors of the affiliated Colleges / Institutions and all concerned.

Copy for information and necessary action to :-

All Deputy Registrars and Assistant Registrars Examination section

Copy for information to :-

Deans in the Faculty of Humanities, Science and Technology, Commerce and Management, Interdisciplinary.

Copy for information to :-

(1) P.A. to Hon'ble Vice-Chancellor (2) P.A. to Hon'ble Pro Vice-Chancellor

(3) P.A. to Registrar (4) P.A to Director, Board of Examinations and Evaluation

डॉ. विनोद पाटील
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

(MU Exam Mission – 2020)

मुंबई विद्यापीठ
महात्मा जोतिबा फुले भवन
परीक्षा विभाग, सांताकुझ (पू)
मुंबई ४०००९८

No. Exam/DBOEE/ICC/2020-21-10

**परीपत्रक :**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरीसराचे समन्वयक/संचालक, यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२०या वर्षातील अंतिम सत्र/वर्षाच्या परीक्षा हया बहूपर्यायी (Multiple Choice Question) पद्धतीने ऑनलाईन घेण्याबाबतचा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंतिम सत्र/वर्षाच्या परीक्षा हया बहूपर्यायी (Multiple Choice Question) ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

- परीक्षेच्या कालावधीत परीक्षा घेऊन निकाल जाहीर होई पर्यंत सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, आणि उपप्राचार्य यांनी रजा घेऊ नये तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आवश्यकतेनुसार नियमित कार्यालयात हजर रहावे.

- सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षेविषयी माहिती मिळावी किंवा विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास त्या सोडविण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात Help Desk ची सुविधा उपलब्ध करुन दयावी.

- इतर महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/दूर व मुक्त अध्ययन संस्था यांचे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात रहात असतील व त्यांनी आपल्या महाविद्यालयास परीक्षेसाठी काही मदत मागितली तर ती सुविधा पुरविण्यात यावी.

पुढे ----२

- प्रत्येक महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील परीक्षार्थी विद्यार्थ्यांची Online पद्धतीने संवाद साधावा व परीक्षा विषयीची माहिती दयावी.
- प्रत्येक महाविद्यालयाने Sample Questions आपल्या महाविद्यालयाच्या Website वर upload केल्याबाबत व Mock Exam घेतल्याबाबतचा अहवाल आपल्या क्लस्टर मधील लीड महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळवावा. जेणे करुन लीड महाविद्यालयांचे प्राचार्य विद्यापीठास सदर अहवाल सादर करु शकतील.

वरील सर्व बाबींची नोंद घेऊन आवश्यतेनुसार संबंधीत समन्वयकांशी संपर्क साधुन योग्य ती कार्यवाही करावी तसेच परीक्षा सुरळीत व वेळेत पारपाडण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे ही विनंती.

**(डॉ. विनोद पाटील)**
**संचालक**
**परिक्षा व मुल्यमापन मंडळ**

**दिनांक** : २२/०९/२०२०
**ठिकाण : मुंबई**

**प्र**ति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित/संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, विद्यापीठाच्या ठाणे, रत्नागिरी व कल्याण उपपरिसराचे समन्वयक/संचालक, सर्व उपकुलसचिव, परिक्षा विभाग.

अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१) उपकुलसचिव, (जनसंपर्क) परीक्षा विभाग मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
२) मा. कुलगुरू यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
३) मा. प्र—कुलगुरू यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
४) मा. कुलसचिव यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे, स्वीय सहाय्यक, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, सांताक्रुझ, मुंबई — ४०००९८.